# महाराष्ट्र शासन

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर** - 440 022

**दुरध्वनी क्रं.** 0712-2870120-21 IN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com


जा.क्र. महाज्योती/नागपूर/मातोश्री/२०२५ -२६/२७५१ दिनांक:- १०/०९/२०२५

## महाज्योती संस्थेमार्फत नाशिक येथील मातोश्री मुलींचे वसतीगृह करिता निवड झालेल्या विद्यार्थीनींना प्रवेशाबाबत सूचना

मा. जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शासन निर्णय क्रमांकः वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, यात्रक फाटा, पंचवटी, नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकुण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रिक्त असलेल्या १३ जागांकरिता दि.२२.०७.२०२५ रोजी पासून ते दि.१०.०८.२०२५ रोजी पर्यन्त ऑनलाईन तसेच ऑनलाईन अर्जाची मूळ प्रत (ऑफलाईन) महाज्योती प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे मागविण्यात आलेले होते.

महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.१०.०८.२०२५ या अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन एकूण ६२ अर्ज प्राप्त झालेले असून महाज्योती प्रादेशिक कार्यालय नाशिक येथे ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थीनींपैकी ३१ विद्यार्थीनींनी ऑफलाईन अर्जाची प्रत नाशिक कार्यालयास सादर/जमा केलेली आहे. त्यामुळे ऑफलाईन अर्जाची प्रत नाशिक या कार्यालयास सादर न -केल्याने एकूण ३१ विद्यार्थीनी अपात्र ठरलेल्या आहेत. तसेच ३१ विद्यार्थीनींनी ऑफलाईन अर्जाची प्रत नाशिक कार्यालयास सादर/जमा केलेल्या विद्यार्थीनींच्या अर्जाची तपासणी केले असता पात्र असलेल्या विद्यार्थीनींच्या प्रवर्गनिहाय तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | प्रवर्ग | रिक्त जागा | प्राप्त अर्ज | छाननीअंती पात्र अर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | ओबीसी | ५ | २४ | ५ |
| २ | व्हीजे -ए | ० | १ | प्रवर्गाच्या जागा शिल्लक नाही. |
| ३ | एनटी - बी | ३ | ३ | ३ |
| ४ | एनटी - सी | २ | १ | १ |
| ५ | एनटी - डी | १ | २ | १ |
| ६ | एसबीसी | २ | ० | अर्ज प्राप्त नाही. |
| | **एकूण** | **१३** | **३१** | **१०** |

महाज्योती कार्यालयाच्या अटी व शर्ती नुसार १० विद्यार्थीनी पात्र ठरलेल्या आहेत. प्राप्त अर्जांची तपासणी खाली नमूद केलेल्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आलेली आहे.

१) विद्यार्थ्यांचे आधारकार्ड झेरॉक्स

२) विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र

३) जात प्रमाणपत्र

४) गुणपत्रिका

५) पालकांचा उत्पन्नाचा दाखला

६) रहिवासी दाखला

७) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत

८) शाळा सोडल्याचा दाखला

९) बोनाफाईड/शैक्षणिक शुल्क भरणा पावती

१०) सक्षम प्राधिकाऱ्याचा वैद्यकीय प्रमाणपत्र

त्यानुसार वरील प्रमाणे कागदपत्रांची तपासणी केल्या नुसार खालीलप्रमाणे पात्र व अपात्र विद्यार्थीनींची यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ.क्र. | यादी | शेरा |
|---|---|---|
| १. | १० विद्यार्थीनींची यादी | पात्र विद्यार्थीनींची यादी |
| २. | ०८ विद्यार्थीनींची प्रतीक्षा यादी | ओबीसी प्रवर्गातील जागा रिक्त नाहीत. प्रवेशीत विद्यार्थिनींने प्रवेश रद्द केल्यास प्रतीक्षा यादीतील विद्यार्थिनीचा विचार केला जाणार याची विद्यार्थिनींने नोंद घ्यावी. |
| ३. | ३१ विद्यार्थीनींची अपात्र यादी | ऑनलाइन अर्ज केला परंतु अर्जाची सत्य प्रत नाशिक कार्यालयास सादर न केल्याने अपात्र विद्यार्थीनींची यादी |
| ४. | १३ विद्यार्थीनींची यादी | कागद पत्राची तपासणी अंती अपात्र असलेल्या विद्यार्थीनींची यादी |

निवड झालेल्या पात्र विद्यार्थीनींना वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. पात्र विद्यार्थीनींनी आपला प्रवेश हा दि.११.०९.२०२५ ते दि.१७.०९.२०२५ या कालावधीत लेखी स्वरुपात अर्ज, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र व प्रवेशित शैक्षणीक वर्षाचे मूळ बोनाफाईड जमा करुन प्रवेश निश्चित करून घ्यावे. ज्या विद्यार्थीनी दि. १७.०९.२०२५ पूर्वी प्रवेश निश्चित करणार नाही अश्या विद्यार्थीनी प्रवेश घेण्यासाठी इच्छूक नाही असे गृहीत धरून प्रतीक्षा यादीतील विद्यार्थीनींची निवड करण्यात येईल.
२. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रूटी/अडचणी उदभवल्यास अश्या विद्यार्थीनींचा प्रवेश रद्द करण्यात येईल.
३. वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी अद्ययावत (latest) सक्षम प्राधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
४. पात्र विद्यार्थीनींना व त्यांच्या पालकांना वेळोवेळी वसतिगृहाकडून निर्गमीत करण्यात येणारे हमीपत्र हे लेखी स्वरुपात भरुन देणे बंधनकारक आहे. तसेच महाज्योती व सारथी कार्यालयाच्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
५. कोणत्याही टप्प्यावर अंतिम निर्णय घेण्याचा व त्यात आवश्यक बदल करण्याचा अधिकार हा महाज्योती संस्था प्रशासनाचा राहील व तो विद्यार्थीनींना बंधनकारक राहील.

स्वा

(मिलिंद नरिंगे)

**व्यवस्थापकीय संचालक**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर